# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

**प्रेसनोट**

## गहूंजे स्टेडियम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक २०२३ सामन्यांसाठी पीएमपीएमएल कडून बस सुविधा

पुणे येथील गहुंजे स्टेडीयम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक २०२३ चे सामने पाहण्यास जाणाऱ्या क्रिकेट शौकिनांसाठी पीएमपीएमएल कडून पुणे मनपा भवन, कात्रज व निगडी टिळक चौक बस स्थानक या तीन ठिकाणांहून बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक २०२३ मधील एकूण ५ सामने पुणे येथील गहुंजे स्टेडीयम येथे होणार आहेत. सदर सामन्यांचे वेळापत्रक देखील जाहीर झाले आहे. त्यास अनुसरून पीएमपीएमएल कडून क्रिकेट शौकिनांना गहुंजे स्टेडीयम येथे येण्या-जाण्याच्या सोयीसाठी पुणे मनपा भवन, कात्रज व निगडी टिळक चौक बस स्थानक या तीन ठिकाणांहून बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच क्रिकेट शौकिनांची गर्दी वाढल्यास आवश्यकतेनुसार तीनही बस स्थानकांवरून जादा बसेसचे नियोजन करण्यात येईल. या बस सुविधेचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | क्रिकेट सामन्याचा दिनांक | बसेस सुटण्याचे ठिकाण | बस सुटण्याची वेळ | तिकीट दर रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | १) १९/१०/२०२३<br>२) ३०/१०/२०२३<br>३) ०१/११/२०२३<br>४) ०८/११/२०२३ | १) पुणे मनपा भवन बस स्थानक | सकाळी ११.०० वा., सकाळी ११.३५ वा., दुपारी १२.०५ वा. | जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी १००/- रूपये |
| | | २) कात्रज बायपास बस स्थानक | सकाळी ११.०० वा., सकाळी ११.३० वा. | जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी १००/- रूपये |
| | | ३) निगडी टिळक चौक बस स्थानक | दुपारी १२.०० वा., दुपारी १२.३० वा. | जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी ५०/- रूपये |
| २ | ११/११/२०२३ | १) पुणे मनपा भवन बस स्थानक | सकाळी ०८.२५ वा., सकाळी ०८.५० वा., सकाळी ०९.०५ वा. | जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी १००/- रूपये |
| | | २) कात्रज बायपास बस स्थानक | सकाळी ०८.१५ वा., सकाळी ०८.३५ वा. | जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी १००/- रूपये |
| | | ३) निगडी टिळक चौक बस स्थानक | सकाळी ०८.३० वा., सकाळी ०९.०० वा. | जाताना व येताना प्रत्येक व्यक्तीसाठी प्रत्येकी ५०/- रूपये |

तरी आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक २०२३ साठी पीएमपीएमएल कडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या बस सुविधेचा लाभ जास्तीत जास्त क्रिकेट शौकिनांनी घ्यावा, असे आवाहन परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

**sd/-**
**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि.१७/१०/२०२३

मा. संपादक,
दैनिक ...........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

**sd/-**
**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---